ePaper

| वर्ष - 8 | अंक - 25 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 30 जुलै 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## पुण्यात नसतानाही धरण भरुन वाहिलंय: अजित पवार



### आतील पानांत


- नदालवर जोकोविच पडला भारी!
- बेन स्टोक्सचे इंडिजविरुद्ध अर्धशतक
- सोनाक्षीने साडी नेसण्यामागचे कारण
- तौबा तौबा' गाण्याची हूकस्टेप!


## उरणमधील तरुणीच्या हत्याकांड प्रकरण

# कर्नाटकातून आरोपीच्या आवळल्या मुसक्या!

### कर्नाटकातील गुलबर्गा जिल्ह्यातील शाहपूर येथून दाऊद शेखला घेतले ताब्यात

।नवी मुंबई ।महाईन्यूज

**उरणमधील तरुणीच्या हत्याकांड प्रकरणात मोठी घडामोड घडली आहे. आरोपी दाऊद शेख याला कर्नाटकातील गुलबर्गा जिल्ह्यातील शाहपूर येथून ताब्यात घेण्यात आले आहे. आधी दाऊदच्या संपर्कात असलेल्या मोहसीन नामक तरुणाला कर्नाटक येथून ताब्यात घेण्यात आल्याचं वृत्त समोर आलं होतं. त्यानंतर नवी मुंबई पोलीस मुख्य आरोपीलाही पकडणार का, याकडे सर्वांचं लक्ष होतं. धक्कादायक म्हणजे मोहसीन आणि दाऊद हे एकच आहेत का, असा सवालही विचारला जात होता.**

हत्येच्या दिवशी म्हणजे २५ जुलै रोजी मोहसीनचाच तरुणीसोबत शेवटचा संपर्क झाल्याची माहिती समोर येत होती. कॉल डिटेल्सच्या आधारे पोलिसांनी कारवाई केली. मुख्य आरोपी दाऊद शेख कर्नाटकात लपून बसल्याचं पोलिसांना समजलं होतं.



हत्येच्या दिवशीचे नवी मुंबईतील घटनास्थळाजवळचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आले आहे. यात २ वाजून १२ मिनिटांनी ज्या मार्गावरुन तरुणी गेली, तिथूनच फक्त दहा मिनिटांनी आरोपीही चालत गेल्याचे सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले आहे.

संबंधित तरुणीची छेड काढल्यामुळे आरोपीवर २०१९ मध्ये पॉस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याला अटक देखील करण्यात आली होती. मात्र सुटल्यानंतर आरोपीने पुन्हा तिच्याशी संपर्क केला असल्याचे समजते. त्यातून ही घटना घडल्याचा अंदाज आहे.

तरुणीचा मृतदेह २६ तारखेला सकाळी उरणमधील एका पेट्रोल पंपाजवळ सापडला होता. त्यानंतर तिच्या आई वडिलांनी दाऊदवर आरोप केले. तिच्या शरीरावर अत्यंत निर्घृणपणे वार केले होते, प्रायव्हेट पार्ट चिरडण्यात आले होते, तर कुत्र्यांनी तिच्या शरीराचे लचके तोडले होते. सध्या नवी मुंबई पोलिसांच्या तीन ते चार टीम आरोपीला शोधण्यासाठी रवाना झाल्या आहेत. आरोपीला लवकरात लवकर पकडण्यासाठी नवी मुंबई पोलिसांचे जलद गतीने तपासकार्य सुरु आहे.

दुसरीकडे, घटना होऊन तीन ते चार दिवस होऊन गेले, तरी आरोपी पकडला जात नाही, असा प्रश्न पीडित मुलीच्या कुटुंबासह नागरिक विचारत आहेत. या घटनेने संपूर्ण उरण शहरामध्ये संतापाची लाट उसळली पाहायला मिळत आहे.

### पोलिसांसमोर होते मोठं आव्हान

उरणमधील तरुणीच्या हत्याकांड प्रकरणात मोठी घडामोड घडली आहे. आरोपी दाऊद शेख याला कर्नाटकातील गुलबर्गा जिल्ह्यातील शाहपूर येथून ताब्यात घेण्यात आले आहे. आधी दाऊदच्या संपर्कात असलेल्या मोहसीन नामक तरुणाला कर्नाटक येथून ताब्यात घेण्यात आल्याचं वृत्त समोर आलं होतं. त्यानंतर नवी मुंबई पोलीस मुख्य आरोपीलाही पकडणार का, याकडे सर्वांचं लक्ष होतं. धक्कादायक म्हणजे मोहसीन आणि दाऊद हे एकच आहेत का, असा सवालही विचारला जात होता.

## विधानसभेसाठी मुख्यमंत्री शिंदेंचं खास मिशन

### भाजपचं वाढलं टेन्शन; मोर्चेबांधणी सुरु, घमासान होणार

।मुंबई ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

राज्यात विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. सर्वच राजकीय पक्षांनी निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या नेतृत्त्वाखालील शिवसेनेनं १०० पेक्षा अधिक उमेदवार देण्याची तयारी सुरु केली आहे. महायुतीत अद्यापपर्यंत जागावाटप झालेलं नाही. पण शिंदेंनी सुरु केलेल्या तयारीमुळे भाजपचं टेन्शन वाढवलं आहे. लोकसभा निवडणुकीवेळी जागावाटप सुरु असताना शिंदेसेनेला बरीच रस्सीखेच करावी लागली होती. हक्काच्या जागा मिळवतानाही शिंदेसेना मेटाकुटीस आली. त्यांना महत्प्रयासानं १५ जागा मिळाल्या. शिवसेनेच्या अनेक पारंपारिक जागांवर त्यांना पाणी सोडावं लागलं. पण लोकसभा निवडणुकीत महायुतीमध्ये सर्वाधिक स्ट्राईक शिंदेसेनेचाच होता. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाआधी शिंदे फ्रंटफूटवर खेळताना दिसत आहेत.



२०१९ मध्ये शिवसेना एकसंध होती. त्यावेळी विधानसभेला भाजप, शिवसेनेची युती होती. त्यावेळी शिवसेनेनं १२४ जागा लढवत ५६ जागा जिंकल्या. शिवसेनेनं जिंकलेल्या ५६ जागांसह सेनेचे उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या मतदारसंघांवर शिंदेसेनेचा दावा आहे. या जागा पदरात पाडून घेण्यासाठी शिंदेसेनेनं मोर्चेबांधणी सुरु केली आहे.

### भाजप 150 पेक्षा अधिक जागा लढवण्याच्या तयारीत

शिंदेसेनेनं १०० जागांची मागणी केलेली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवारांनी गेल्याच आठवड्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची दिल्लीत जाऊन भेट घेतली. त्यावेळी त्यांनी ८० ते ९० जागांची मागणी केली. तर सर्वात मोठा पक्ष असलेला भाजप १५० पेक्षा अधिक जागा लढवण्याच्या तयारीत आहे. राज्यात विधानसभेच्या २८८ जागा आहेत. तिन्ही पक्षाच्या मागण्या पाहता विधानसभेला जागावाटपावेळी बरीच चढाओढ पाहायला मिळेल.

# तुम्ही एकमेकांच्या विरोधात लढताय!का?

## राज ठाकरे यांची महाराष्ट्रातील संघर्षावर टीप्पणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**: महाराष्ट्रात आरक्षणाच्या मुद्द्यावरून जातीय संघर्ष निर्माण झाल्याचं चित्र आहे. राज्यातील नेत्यांनी यावर अनेकदा प्रतिक्रियासुद्धा दिली आहे. दरम्यान, आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही महाराष्ट्रातील जातीय संघर्षावर टीप्पणी केली आहे. व्यंगचित्रकार शि.द. फडणीस यांच्या एका व्यंगचित्राचा हवाला देत त्यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली.**



राज ठाकरे हे गेल्या दोन दिवसांपासून पुणे दौऱ्यावर आहेत. रविवारी त्यांनी पुण्यातील पूरपरिस्थितीची पाहणी केली. तसेच आज त्यांनी व्यंगचित्रकार शि. द फडणीस यांनी वयाच्या शंभराव्या वर्षात पदार्पण केल्याच्यानिमित्त आयोजित कार्यक्रमातही सहभाग घेतला. यावेळी बोलताना राज ठाकरे यांनी राज्यातील जातीय संघर्षावर मार्मिक भाष्य केलं.शि. द फडणीस यांचे एक व्यंगचित्र आहे. या व्यंगचित्रात एक मांजर आहे आणि तिची पिल्लं दूध पित आहेत. त्यात एक उंदीरदेखील आहे. एक वात्सल्याचा तो भाव आहे. जर आज मी ते व्यंगचित्र करायला घेतलं, तर मी दाखवीन की मांजर तिथेच आहे. पिल्लं अंगावरच्या पट्ट्यांमुळे भांडत आहेत. मी या जातीचा, तू कोणत्या जातीचा? बाकी सर्व उंदीर दूध पित आहेत आणि ती मांजर म्हणजे महाराष्ट्र आहे, असे राज ठाकरे म्हणाले. महत्त्वाचे म्हणजे राज ठाकरे यांनी यापूर्वीसुद्धा व्यंगचित्रांच्या माध्यमांतून महाराष्ट्रातील जातीय संघर्षाबाबत भाष्य केलं आहे. भीमा-कोरेगाव हिंसाचाराची पार्श्वभूमीवर राज ठाकरेंनी त्यांच्या फेसबूक पेजवर एक व्यंगचित्र पोस्ट केलं होतं. या व्यंगचित्रात शिवाजी महाराज वेगवेगळ्या जातीच्या लोकांशी संवाद साधत असल्याचे दाखवण्यात आलं होतं. 'अरे, तुम्हासर्वांना बरोबर घेऊन मी मुघलांशी लढलो! आणि आज तुम्ही एकमेकांच्या विरोधात लढताय!का? तर त्या जातीयवादी स्वार्थी नेत्यांसाठी! या रे माझ्या लेकरांनो त्या चिखलातून बाहेर या!, असे छत्रपती शिवाजी महाराज दलित, मराठा व ब्राह्मण समाजातील पात्रांना उद्देशून बोलताना दाखवण्यात आले होते.याशिवाय आणखी एक व्यंगचित्रात राज ठाकरे यांनी महाराष्ट्रातील जातीयवादाबाबत भाष्य केलं होतं. या व्यंगचित्रात काही महिलांनी त्यांच्या राज्याच्या वेशभूषा परिधान केलेल्याचं दाखवण्यात आलं होतं. त्यावर तामिळ अस्मिता, बंगाली अस्मिता, पंजाबी अस्मिता, असे लिहिण्यात आलं होतं. मात्र, महाराष्ट्रातील महिलेच्या वेशभूषेवर दलित, ब्राह्मण, आगरी, माळी, असा विविध जातींच्या नावाचा उल्लेख करण्यात आला होता. राज ठाकरे हे गेल्या दोन दिवसांपासून पुणे दौऱ्यावर आहेत. रविवारी त्यांनी पुण्यातील पूरपरिस्थितीची पाहणी केली. तसेच आज त्यांनी व्यंगचित्रकार शि. द फडणीस यांनी वयाच्या शंभराव्या वर्षात पदार्पण केल्याच्यानिमित्त आयोजित कार्यक्रमातही सहभाग घेतला. यावेळी बोलताना राज ठाकरे यांनी राज्यातील जातीय संघर्षावर मार्मिक भाष्य केलं.शि. द फडणीस यांचे एक व्यंगचित्र आहे. या व्यंगचित्रात एक मांजर आहे आणि तिची पिल्लं दूध पित आहेत. त्यात एक उंदीरदेखील आहे. एक वात्सल्याचा तो भाव आहेतर मी दाखवीन की मांजर तिथेच आहे. पिल्लं अंगावरच्या पट्ट्यांमुळे भांडत आहेत. मी या जातीचा, तू कोणत्या जातीचा? बाकी सर्व उंदीर दूध पित आहेत आणि ती मांजर म्हणजे महाराष्ट्र आहे, असे राज ठाकरे म्हणाले. महत्त्वाचे म्हणजे राज ठाकरे यांनी यापूर्वीसुद्धा व्यंगचित्रांच्या माध्यमांतून महाराष्ट्रातील जातीय संघर्षाबाबत भाष्य केलं आहे

### त्या चिखलातून बाहेर या!

या व्यंगचित्रात शिवाजी महाराज वेगवेगळ्या जातीच्या लोकांशी संवाद साधत असल्याचे दाखवण्यात आलं होतं. 'अरे, तुम्हासर्वांना बरोबर घेऊन मी मुघलांशी लढलो! आणि आज तुम्ही एकमेकांच्या विरोधात लढताय!का? तर त्या जातीयवादी स्वार्थी नेत्यांसाठी! या रे माझ्या लेकरांनो त्या चिखलातून बाहेर या!, असे छत्रपती शिवाजी महाराज दलित, मराठा व ब्राह्मण समाजातील पात्रांना उद्देशून बोलताना दाखवण्यात आले होते.

# लोणावळ्यात २६ पर्यटकांवर गुन्हे

## प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग केल्याप्रकरणी कारवाई

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जीव धोक्यात घालून सहारा पूल परिसरातील धबधब्याच्या परिसरात हुल्लडबाजी करणाऱ्या २६ पर्यटकांविरुद्ध लोणावळा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. भुशी धरण परिसरातील धबधब्यात एकाच कुटुंबातील पाच जण वाहून गेल्याची घटना नुकतीच घडली.**



वर्षाविहारासाठी पुणे-मुंबईसह राज्याच्या वेगवेगळ्या भागातून पर्यटक येतात. अनेक पर्यटक जीव धोक्यात घालून हुल्लडबाजी करतात. धबधब्याच्या परिसरात मोबाइल कॅमेऱ्याद्वारे छायाचित्र काढतात.धबधब्याच्या प्रवाहात पर्यटक वाहून गेल्याच्या घटना घडल्याने जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी हुल्लडबाजी करून जीव धोक्यात घालणाऱ्या पर्यटकांविरुद्ध कारवाईचा आदेश पोलिसांना दिला आहे. लोणावळा, खंडाळा परिसरासह जिल्ह्यातील पर्यटनस्थळांवर प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आला आहे. आदेशाचे उल्लंघन करून लोणावळ्यातील सहारा पुलासमोरील धबधब्याच्या परिसरात हुल्लडबाजी करणाऱ्या चार वेगवेगळ्या गटांतील २६ पर्यटक तरुणांविरुद्ध लोणावळा पोलिसांनी रविवारी गुन्हा दाखल केला. प्रतिबंधात्मक आदेश भंग केल्याप्रकरणी भारतीय न्यायसंहिता २०२३ कलम २२३ अन्वये रविवारी सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल करण्यात आलेले पर्यटक तरुण मुंबई, मावळ, मुळशी, शिक्रापूर, शिरूर, चाकण, खेड, पुणे शहर परिसरातील आहेत. याबाबत पोलीस नाईक हनुमंत शिंदे आणि रईस मुलाणी यांनी स्वतंत्र फिर्याद दाखल केल्या असून, पोलीस निरीक्षक सुहास जगताप तपास करत आहेत. वर्षाविहारासाठी पुणे-मुंबईसह राज्याच्या वेगवेगळ्या भागातून पर्यटक येतात.

### पर्यटनस्थळांवर प्रतिबंधात्मक आदेश लागू

धबधब्याच्या परिसरात मोबाइल कॅमेऱ्याद्वारे छायाचित्र काढतात. धबधब्याच्या प्रवाहात पर्यटक वाहून गेल्याच्या घटना घडल्याने जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी हुल्लडबाजी करून जीव धोक्यात घालणाऱ्या पर्यटकांविरुद्ध कारवाईचा आदेश पोलिसांना दिला आहे. लोणावळा, खंडाळा परिसरासह जिल्ह्यातील पर्यटनस्थळांवर प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आला आहे.

## "शरद पवारांवर बोललेलं लोकांनाच पटत नाही, महाराष्ट्रात महाविकास आघाडीला

# सत्तेपासून कोणी रोखू शकणार नाही!

### मिसळ पे चर्चा: शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांचा विश्वास

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी -चिंचवड: गुजरात मधील नेते महाराष्ट्रात येऊन शरद पवारांवर टीका करतात हे लोकांना पटत नाही. महाराष्ट्रात कुणीही येऊ द्या. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी किंवा अमित शहा, आता महाराष्ट्रात महाविकास आघाडीला सत्तेपासून कोणी रोखू शकणार नाही, असा विश्वास शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केला आहे. ते पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. रोहित पवारांनी पिंपरी- चिंचवड मधील मिसळचा आस्वाद घेतला. यावेळी शहराध्यक्ष तुषार कामठे, पदाधिकारी विशाल वाकडकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.**

शरद पवारांवर अमित शहा यांनी टीका करताच अजित पवारांच्या आमदारांनी नाराजी व्यक्त केली होती. शरद पवार आणि अजित पवार हे एकत्र आले तर आनंदच असं देखील म्हटलं होतं. यावर रोहित पवार यांनी स्पष्ट मत व्यक्त करत लोकसभा संपली आहे. त्याआधी अजित पवारांच्या आमदारांनी भूमिका घेतली असती तर आम्ही समजू शकलो असतो. परंतु, विकास व्हावा म्हणून अजित पवार भाजपसोबत सत्तेत गेले. शरद पवार यांनी निवृत्त व्हावं अशी टीका देखील त्यांनी केली होती. आता विधानसभा निवडणुका असल्याने दोन्ही नेत्यांनी एकत्र यावं असं अजित पवारांच्या आमदारांना वाटत असलं तरी यावर शरद पवार हे निर्णय घेतील. पुढे ते म्हणाले, निष्ठावंत कार्यकर्त्यांना सोबत घेऊन महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आणायचं असल्याचं शरद पवारांनी ठरवलं आहे, असं म्हणत रोहित पवारांनी अजित पवारांच्या आमदारांना उत्तर दिलं आहे.

सध्या अजित पवार हे सुप्रिया सुळे आणि शरद पवार यांच्या बद्दल फार काही टीका करताना दिसत नाहीत. यावरून देखील रोहित पवारांनी अजित पवारांना टोला लगावला आहे.



### प्रलंबित कामे मार्गी लावणार...

लोकसभेच्या निकालानंतर शरद पवारांवर जास्त काही बोललेलं लोकांना आवडत नसल्याने अजित पवारांनी शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या बद्दल काही बोलणं बंद केलं आहे. अन्यथा ते त्यांच्यावर बुमरँग होऊ शकतं, याचा फटका मतांमध्ये बसू शकतो. अशी शक्यता वर्तवली असल्याने अजित पवार हे शरद पवार आणि सुप्रिया सुळेंबद्दल बोलत नसतील, असं रोहित पवारांनी म्हटलं आहे.

---

## चिखली-तळवडे- रुपीनगरमधील वीज समस्या सोडवण्यासाठी पुढाकार!

### आ. महेश लांडगे यांच्या सूचनेनुसार अधिकाऱ्यांची बैठक; स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्त्यांच्या व्यथा

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या आठवडाभरात झालेल्या अतिमुसळधार पाऊसामुळे ठिकठिकाणी पाणी साचले. त्यामुळे भोसरी विधानसभा मतदार संघातील चिखली, तळवडे-रुपीनगर रहिवाशी आणि औद्योगिक पट्ट्यातील वीज समस्या मोठ्या प्रमाणात उद्भवली आहे. परिणामी, सर्वसामान्य नागरिक, व्यापारी, उद्योजक आणि नोकरदार यांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागला. त्यामुळे वीज समस्या सोडवण्यासाठी महावितरण प्रशासन व स्थानिक लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेतला आहे.**

सर्वसामान्य नागरिकांकडून वीज समस्यांबाबत तक्रारी येत आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांच्या सूचनेनुसार महावितरणचे अधिकारी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांची एकत्रित बैठक घेण्यात आली. महानगरपालिका प्रभाग क्रमांक- १ मधील चिखली गावठाण भाग, पाटीलनगर, गणेशनगर, मोरे वस्ती, म्हात्रे वस्ती,ताम्हाणे वस्ती,, शेलार वस्ती, सोनवणे वस्ती आदी भागातील वीज समस्या सोडवण्यासाठी महावितरण प्रशासनाचे अधिकारी यांच्यासोबत चर्चा करण्यात आली.

यावेळी माजी नगरसेवक सुरेशतात्या म्हेत्रे, माजी नगरसेवक कुंदन गायकवाड, जितेंद्र यादव, माजी स्वीकृत सदस्य दिनेश यादव, सामाजिक कार्यकर्ते विनायक मोरे, योगेश सोनवणे, अंकुश मळेकर, ऋषी मोरे, अविनाश मोरे, कामगार नेते किसन बावकर, रविंद्र राजगुरू, संतोष सुळके आदी उपस्थित होते. तसेच, महावितरणचे कार्यकारी अभियंता अतूल देवकर, उपकार्यकारी अभियंता अशोक जाधव, कनिष्ठ अभियंता शाम दिवटे यांनी वीज विषयक समस्या जाणून घेतल्या. त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आहे.



### प्रलंबित कामे मार्गी लावणार...

दरम्यान, तळवडे-रुपीनगर येथील समस्यांबाबतही बैठक घेण्यात आली. यामध्ये वीज समस्या निर्माण झालेल्या परिसरामध्ये वीज वाहिनी भूमिगत करणे आणि जुन्या ओव्हरहेड वीजवाहिन्या काढून टाकणे, जुने फिडर पिलर आवश्यक आहे तिथे बदलणे, वीज वाहिन्यांचे सर्व्हेक्षण करुन ना-दुरूस्त झालेल्या वाहिन्या बदलणे, नवीन ट्रान्सफार्मर बसवणे, आरडीएसएस व डीपीडीसी मार्फत निधीची उपलब्धता करुन वीज विषयक प्रलंबित कामे मार्गी लावण्याचे निश्चित करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक शांताराम भालेकर, पांडुरंग भालेकर, अनिल भालेकर, संदीप जाधव, रामदास कुटे, वैभव खोडवे आदी उपस्थित होते.

> अतिमुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी वीज समस्या निर्माण झाल्या आहेत. वीज समस्या सोडवण्यासाठी नागरिकांनी 'परिवर्तन हेल्पलाईन- 93 79 90 90 90' वर संपर्क करावा. मी आणि माझे सहकारी वीज समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध आहोत. गेल्या आठवडाभरामध्ये सर्वसामान्य नागरिक, गृहणी, उद्योजक आणि व्यावसायिकांना वीज पुरवठा खंडीत झाल्यामुळे नाहक मन:स्ताप सहन करावा लागला आहे. त्यामुळे तातडीने दुरूस्तीचे कामे व उपाययोजना करण्याच्या सूचना महावितरण प्रशासनाला केल्या आहेत.
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.




## भूमिका

# चाफा बोलेना, चाफा चालेना

**कविवर्य नारायण मुरलीधर गुप्ते यांच्या अलौकिक लेखनकौशल्यातून साकारलेला नि गानकोकिळा लताजींच्या सुमधुर कंठातून स्वरबद्ध झालेला चाफा रसिकांच्या मनात कायम फुलून आहे. अबोल प्रियकर, प्रेयसी यांचे 'प्रतिकात्म रूप' बनलेला चाफा हळूच मनकल्पित भावविश्वात प्रवेशतो आणि आपले पक्के बस्तान मांडून बसतो.**

सर्वांनी अबोल ठरवलेला चाफा प्रत्येकाला बोलते करतो. कंठात दाटलेल्या, ओल्या ओठांवर अडखळलेल्या मूक भावनांना शब्दबद्ध करतो. रुसलेल्या मनाची प्रतिकात्म काव्यप्रभा फुलविण्याची किमयागिरी साकारणारा 'कियमागार चाफा!' 'आभाळओल' ललित संग्रहातील विजयकुमार मिठे यांच्या मनमोहक ओळी वरील विवेचनास अगदी समर्पक आहेत."तिच्या एका अबोल्यानं मुका व्हायचा चाफातिच्या नुसत्या हसण्यानेही फुलून यायचा चाफा"



स्वतः मूक राहून इतरांना बोलण्यास भाग पाडणाऱ्या चाफ्याची मोहनी सर्वांगाला पुलकित करते. ओंजळीत घेतलेल्या फुलांचा गंध हळूहळू बेधुंदीच्या परम उंचीवर नेतो. जगापासून फारकत घेऊन घेतलेल्या विजनवासाचा, मनाच्या एकांतोत्सवाचा 'एकमेवाद्वितीय' साक्षीदार चाफा असतो. मूक भावनांची सचेत अभिव्यक्ती म्हणजे चाफा. आठवणींच्या क्षणांना फुलवत मनातील चैत्रपालवीला सदाहरीत ठेवण्याचे अदभूत कौशल्य चाफ्याला साधलेलं आहे. चाफ्याची फुलं पानांच्या आडून लपंडाव खेळत ऊन सावलीत खळखळून हसतात. त्यांना बघून उदासीन मन पुन्हा हर्षोल्हासित होतं. क्षणभर का होईना दुःखाचा विसर पडतो. चाफ्याला कितीही दूर दूर सारले तरीही तो कुंपणातून डोके वर काढून "मी आलो....." म्हणत वाकुल्या दाखवतो. बागेत असेल तर मग मात्र नक्कीच खिडकीतून आत डोकावून घरात काय काय चाललंय हे बघणारच लबाड! मग येता जाता प्रसन्न फुललेल्या चाफ्याला बघायला आसुसलेले डोळे ओझरत्या दृष्टीक्षेपात चाफ्यावर थिजतात. तृप्तता शिगेला पोहचेपर्यंत त्याचं मनमोहक लावण्य डोळेभरून पापणकडा पाहून घेतात. छोटं रोपटं अंगणात लावलं की त्याला वयात यायला बराच वेळ लागतो. चाफा वयात आल्यावर मात्र कुणासाठीही थांबत नाही. तारुण्यात पदार्पण करताच पानगळ होऊन सावळ्या देहयष्टीवर हिरवाईच्या अंकुरांचे वस्त्र परिधान करतो चाफा. पानांचा आकार मोठा होताच पानांच्या गुच्छातून छोट्या छोट्या कलिका जन्मास येतात. कलिकांचे फुलात रूपांतर होते नि चाफा बहरून फुलतो. अहाहा! काय ते देखणं लावण्य बहरलेल्या चाफ्याचं! विविधरंगी चाफा सगळीकडे आपल्या रंगाची मुक्त उधळण करतो. देवचाफा 'देवाचिये द्वारी' सन्मानाने फुलतो. सूर्याचे सोनवर्ख अंगावर लेवून सोनचाफा पहाटेच्या कोवळ्या उन्हात चकाकतो. सखीच्या गुलाबी ओठांची लाली लेवून गुलबट टवटवीत चाफा मनास भुरळ पाडतो. घनदाट कुंतलावर लुकलूकणाऱ्या चांदण्या बनून पांढरा चाफा गजऱ्यात खुलतो. हिरवा चाफा वेलीवरच्या डेखावर मान टाकून आरामात विसावतो. दुर्मिळ भुईचाफा थेट भुईवरच्या जाडसर संदलातून आपले अस्तित्व दाखवून देतो. कवठाचा सुगंध चोरून फुललेला कवठी चाफ्याचा गंध परसात दरवळत राहतो. लालबुंद तांबडा चाफा लक्ष वेधून घेतो तर काश्मिरी केशर पिऊन केशरिया झालेल्या नागचाफ्याची शेलाटी पाहून पाहणाऱ्यांच्या डोळ्यांचे पारणे फिटते. नवरात्रोत्सवात रंगीबेरंगी चाफ्याच्या माळा आदिशक्तीच्या कंठाची शोभा वाढवतात. बहुरंगी चाफ्याला त्याच्या वैविध्यपूर्ण व्यक्तिमत्वाने धार्मिक अधिष्ठान प्राप्त झालेले आहे.चाफ्याच्या झाडाचे अनन्यसाधारण वैशिष्ट्य म्हणजे चाफ्याच्या झाडावर भुंग्याची गुंजारव होत नाही. 'कविभूषण' यांनी छत्रपती शिवरायांच्या गुणगौरवार्थ लिहिले आहे... "लेई रस एतनेको बैठि न सकत अहै, अलि नवरंगजेब चम्पा सिवराज हैं।" अर्थात चाफ्याच्या पुष्पाप्रमाणे दैदिप्यमान असलेल्या शिवरायांच्या वाटेला वेगवेगळ्या राज्यरूपी फुलाफुलांवर उडणारा 'भ्रमर औरंगजेब' कधीही जात नाही. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि कर्तव्यदक्ष 'छत्रपती शिवराय' यांची नि चाफ्याची तुलना कविभूषण यांनी करून चाफ्याचे भाग्य सुवर्णाक्षरात कोरले आहे. आपल्या सौंदर्याचा कुठलाही गर्व, अहंकार चाफ्याच्या लवलेशीही नाही.

## प्रासंगिक »

# निकालाच्या मर्यादा!

***मुळात खनिजांवरील स्वामित्वधनाचा वादच 'प्रसंगी दांडगाई, अरेरावी करणारे केंद्र सरकार आणि प्रसंगी बेजबाबदारपणाचे दर्शन घडवणारी राज्ये' यांच्यातला!***

खंडपीठाने ८-१ अशा बहुमताने दिलेला निकाल सर्वार्थाने दूरगामी आहे. यातील मुद्दे केवळ आर्थिक नाहीत. केंद्र-राज्य संबंधांपासून ते कर आकारणीबाबत राज्यांची स्वायत्तता ते पर्यावरण आणि राज्या-राज्यांतील स्पर्धा अशा अनेक मुद्द्यांवर या निर्णयाचा परिणाम होणार असून हा निर्णय जर पूर्वलक्ष्यी प्रभावाने अमलात आला तर आर्थिक आणि राजकीय आघाडीवर हलकल्लोळ माजेल यात शंका नाही. या विषयाची व्याप्ती लक्षात घेता जे झाले ते राज्यघटनेची कलमे आदी तांत्रिक मुद्दे दूर ठेवून समजून घेणे आवश्यक ठरते. सुमारे पाव शतकभर न्यायप्रविष्ट असलेले हे प्रकरण म्हणजे 'मिनरल एरिया डेव्हलपमेंट ऑथॉरिटी विरुद्ध स्टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया' यांच्यातील खटला. त्यात पुढे झारखंड, प. बंगाल, ओडिशा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गोवा, कर्नाटक ही राज्ये आणि प्रत्यक्ष केंद्र सरकार उतरले. यावरून हे प्रकरण सर्वपक्षीय आहे हे लक्षात येईल.

भारतात जातीय राजकारणाला दीर्घ इतिहास आहे. ब्रिटिश राजवटीतच पारंपारिक जाती व्यवस्थेत ताणतणाव निर्माण झाला. राजकीय सत्तेत वाटा मिळविण्यासाठी सर्वच जातीत सांस्कृतिक स्पर्धेऐवजी राजकीय स्पर्धा सुरू झाली.

# मराठा-ओबीसी संघर्षाची राजकीय खेळी !

१९३५ ते १९४८ या काळात मतदार संघाची व्याप्ती व आकार वाढत गेला आणि जातीय प्रतिनिधित्वाच्या चळवळी पुढे आल्यात. भारतीय संविधानाने समताधिष्ठित समाज रचना निर्माण करण्याचा प्रयत्न केला असला तरी जातीचा प्रभाव मात्र टिकूनच राहिला. १९८० नंतरच्या काळातील मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार देशातील राजकारणाचा चेहरा बदलला. अनेक घटक राज्याचं राजकारण या नव्या शिफारशीने प्रभावित झाले. मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार देशात ठिकठिकाणी वादळ उठले असले तरी वरचढ जातींच्या नेतृत्वाला शह देऊन इतर मागास जातींचे नेतृत्व पुढे आले. भारतातील विषम जातीव्यवस्थेमुळे राज्यकर्त्या वर्गास स्थिर होण्यास हातभार लागला. राजकारणात स्थिर झालेले आणि स्थिर होऊ इच्छिणारे आरक्षणासारखा ज्वलंत प्रश्न घेऊ सामाजिक व राजकीय मोट बांधतात. ग्रामपंचायतीच्या निवडणुकांपासून ते राष्ट्रपतीच्या निवडणुकीपर्यंत जातीयतेचा




प्रभाव असतो. सरपंच, सभापती, अध्यक्ष, मुख्यमंत्री, पंतप्रधान, राष्ट्रपती इत्यादी पदे राजकीय समीकरणे आखूनच दिली जातात. निवडणुकीचे तिकीट वाटप करण्यापासून ते निवडणूक जिंकण्यापर्यंत, त्यानंतर मंत्रीपदाच्या वाटपापर्यंत जातीचा विचार होतो. महाराष्ट्रात मराठा, ब्राह्मण व मागासवर्गीय जातींचा, उत्तर प्रदेशात राजपूत व जाट, बिहारमध्ये राजपूत, ब्राह्मण, कायस्थ आणि आदिवासी, आंध्रप्रदेशात रेड्डी आणि कम्मा या दोन जाती, तामिळनाडूत मुदलियार व गौडरव पदयाची, बिहारमध्ये राजपूत, ब्राह्मण, कायस्थ आणि आदिवासी, केरळमध्ये ब्राह्मण नायर आणि इझवा तर पंजाबमध्ये शिख धर्माचा प्रभाव आहे. अशाप्रकारे घटकराज्यात बहुसंख्य असलेल्या जातीचे नेते राजकारणाची दिशा निश्चित करतात. त्यातूनच देश पातळीवर समीकरणे आखली जातात. साधारणपणे देशपातळीवर विविध जाती-जमाती आपापल्या उमेदवारांनाच मते देतांना दिसतात. त्यातूनच जातीनिहाय नेते आपले राजकारण स्थिर करतात. भारतातील बहुसंख्य राजकीय पक्षाची निर्मिती मुळात जातीय व धार्मिक आधारावर झाल्याने त्यातूनच जातीय व धार्मिक नेते पुढे आलेत. ही जातीय नेते मंडळी वेगवेगळ्या पक्षात विखुरल्याने तो समाजही विखुरला. परिणामी त्या-त्या जातीच्या व धर्माच्या सुरक्षिततेचे राजकारण वेग घेते. मग सर्वसामान्य नागरिक बहुजन आणि त्याचा विकास म्हणजे काय ? या प्रश्नाचे उत्तर शोधायला लागतात. भारतीय समाज पश्चिमात्य समाजाप्रमाणे आधुनिक होऊन जातिवाद, प्रांतवाद, भाषावाद, धर्मवाद असे प्रश्न देशात शिल्लक राहणार नाहीत असे एका गटाला वाटत होते, तर दुसऱ्या गटाच्या मते पाश्चात्य अर्थाने आधुनिक होणे भारतासाठी शक्य नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# जागावाटपाचा तिढा वाढणार!

## » महादेव जानकर यांनी केली 50 जागांची मागणी

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दोन महिन्यांवर आलेल्या विधानसभा निवडणुकीसाठीचं जागावाटप राज्यातील सत्ताधारी महायुती आणि विरोधी पक्षातील महाविकास आघाडीसाठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे. त्यात सत्ताधारी महायुतीमध्ये शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांनी अधिकाधिक जागांची मागणी करत महायुतीमधील प्रमुख पक्ष असलेल्या भाजपाचं टेन्शन वाढवलं आहेत.**



महायुतीमधील छोट्या पण प्रमुख पक्षांपैकी एक असलेल्या महादेव जानकर यांच्या राष्ट्रीय समाज पक्षाने ५० जागांची मागणी केली आहे. महादेव जानकर यांच्या या मागणीमुळे आधीच जागावाटपावरून पेचप्रसंग निर्माण झालेल्या महायुतीमधील तिढा आणखीनच वाढण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीबाबत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना महादेव जानकर यांनी सांगितलं की, आमच्याकडून विधानसभेच्या २८८ जागांवर तयारी सुरू आहे. कुठल्याही पक्षासोबत आपण युती करतो, तेव्हा विद्यमान आमदाराला पर्याय आपल्याला तयार ठेवावा लागतो. त्या दृष्टीने आम्ही २८८ जागांवर तयारी करत आहोत.तर काही ठिकाणी मित्रपक्षांचा आम्हाला फायदा होईल.धानसभा आणि विदर्भातील ६२ मतदारसंघात मेळावे घेत आहोत. तसेच २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय समाज पक्षाचा २०वा वर्धापन दिन हा अकोला येथे ठेवण्यात आला आहे. या मेळाव्याला ५० हजार लोक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. आहे.यावेळी महायुतीमधील राष्ट्रीय समाज पक्षाला अपेक्षित असलेल्या जागांबाबत महादेव जानकर यांनी सांगितले की, महायुतीमधून आम्हाला किमान ५० जागा मिळाव्यात, अशी आमची अपेक्षा आहे. महायुतीमधील नेते देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याकडून आम्हाला ५० जागा मिळतील, अशी अपेक्षा आहे, असेही महादेव जानकर म्हणाले. दरम्यान, लोकसभा निवडणुकीमध्ये महादेव जानकर यांच्या राष्ट्रीय समाज पक्षाला एक जागा देण्यात आली होती. परभणी लोकसभा मतदारसंघातील त्या जागेवरून स्वत: महादेव जानकर लढले होते. मात्र त्यांना ठाकरे गटाच्या संजय जाधव यांच्याकडून पराभव पत्करावा लागला होता.

### राष्ट्रीय समाज पक्षाला एक जागा

अशी आमची अपेक्षा आहे. महायुतीमधील नेते देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याकडून आम्हाला ५० जागा मिळतील, अशी अपेक्षा आहे, असेही महादेव जानकर म्हणाले. दरम्यान, लोकसभा निवडणुकीमध्ये महादेव जानकर यांच्या राष्ट्रीय समाज पक्षाला एक जागा देण्यात आली होती. परभणी लोकसभा मतदारसंघातील त्या जागेवरून स्वत: महादेव जानकर लढले होते. मात्र त्यांना ठाकरे गटाच्या संजय जाधव यांच्याकडून पराभव पत्करावा लागला होता.

महायुतीमधील छोट्या पण प्रमुख पक्षांपैकी एक असलेल्या महादेव जानकर यांच्या राष्ट्रीय समाज पक्षाने ५० जागांची मागणी केली आहे. महादेव जानकर यांच्या या मागणीमुळे आधीच जागावाटपावरून पेचप्रसंग निर्माण झालेल्या महायुतीमधील तिढा आणखीनच वाढण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीबाबत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना महादेव जानकर यांनी सांगितलं की, आमच्याकडून विधानसभेच्या २८८ जागांवर तयारी सुरू आहे. कुठल्याही पक्षासोबत आपण युती करतो, तेव्हा विद्यमान आमदाराला पर्याय आपल्याला तयार ठेवावा लागतो. त्या दृष्टीने आम्ही २८८ जागांवर तयारी करत आहोत. काही ठिकाणी त्याचा आमच्या मित्र पक्षांना फायदा होईल. तर काही ठिकाणी मित्रपक्षांचा आम्हाला फायदा होईल. त्यादृष्टीने आम्ही राज्यातील २८८ विधानसभा आणि विदर्भातील ६२ मतदारसंघात मेळावे घेत आहोत. तसेच २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय समाज पक्षाचा २०वा वर्धापन दिन हा अकोला येथे ठेवण्यात आला आहे. या मेळाव्याला ५० हजार लोक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. आहे.यावेळी महायुतीमधील राष्ट्रीय समाज पक्षाला अपेक्षित असलेल्या जागांबाबत महादेव जानकर यांनी सांगितले की, महायुतीमधून आम्हाला किमान ५० जागा मिळाव्यात.

# बोगस अधिकाऱ्यांची चिडफाड आम्ही करू

## » कारवाई करण्यासाठी सरकार कमी पडलं : बच्चू कडू

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिव्यांगाचे प्रमाणपत्र वापरणारे बोगस अधिकारी यांची माहिती गोळा करत आहेत. दिव्यांगांसारख्या वेदनादायी घटकाचा आरक्षण हिसकावून घेणाऱ्या अधिकाऱ्यांचे चिरफाड आम्हीच करणार, यांच्यावर कारवाई करण्यासाठी सरकार कमी पडलं तर आम्ही ते काम करू असा इशारा आमदार बच्चू कडू यांनी दिलाय. आज लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते.**



देवणी येथील शेतकरी आणि कार्यकर्त्यांच्या मेळाव्यांना ते हजर होते.पूजा खेडकर प्रकरणानंतर राज्यातील अनेक अधिकाऱ्यांनी केलेले कारनामे उघड होत आहेत. दरम्यान, आमदार बच्चू कडू यांनी दिव्यांग प्रमाणपत्र वापरून अनेक अधिकारी यांनी सरकारी नोकरीमध्ये उच्चपदस्थ अधिकारी म्हणून काम सुरू केला आहे. त्यांच्यावर कडक कारवाई अपेक्षित असल्याचे सांगत सरकारला इशारा दिला.पूजा खेडकर प्रकरणानंतर राज्यातील अनेक अधिकाऱ्यांनी केलेले कारणामे उघड होत आहेत.

बुलढाण्याचे उपजिल्हाधिकारी रुपेश पागोरे यांनी दिव्यांगाचे प्रमाणपत्र वापरून नोकरी मिळवली आहे. असेच प्रकार राज्यातील अनेक अधिकाऱ्यांनी केल्याचं आता उघड होत आहे.

त्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे अशी ही सार्वत्रिक भावना असून सरकार ही कारवाई करण्यास असमर्थ असेल तर आम्ही ती करू असे बच्चू कडू म्हणाले.राज्यातले सरकार सध्या ज्या योजना आणत आहे.

### एजन्टला जास्त पैसे मिळतात

त्यांच योजना काँग्रेसने आणण्याचा प्रयत्न केलाय. जर महायुती सरकार तेच करणार असेल तर काय अर्थ आहे. आमचे 16 मुद्दे आहेत, ते जर मान्य होतं असतील तर ते जे कोणी मान्य करेल त्या आघाडी, युतीला आमचा पाठिंबा असेल, असेही बच्चू कडू म्हणाले. आम्ही मुद्यावर लढतोय आम्हला विधानसेभेची अपेक्षा नाही. मुद्दा मान्य झाला तर ज्यांनी तो मान्य केला त्यांना आम्ही पाठिंबा देणार असल्याचेही ते म्हणाले.सध्याघडीला देशात मोठा प्रश्न आर्थिक विषमतेचा आहे. काम करणाऱ्याला कमी पैसे आणि एजन्टला जास्त पैसे मिळतात.

# भाजपाच्या चक्रव्यूहामागे मोठ्या शक्ती

## चक्रव्यूहचा पहिला हल्ला छोट्या-मध्यम उद्योगांवर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ज्याप्रमाणे चक्रव्यूहात अडकवून अभिमन्यूला मारण्यात आलं, त्याप्रमाणे देशातील जनतेलाही चक्रव्यूहात अडकवलं जात आहे. या चक्रव्यूहाच्या केंद्रस्थानी पंतप्रधान मोदी आणि इतर पाच जणं आहेत, अशी टीका काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली आहे. आज लोकसभेत अर्थसंकल्पावर बोलताना त्यांनी मोदी सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडलं.**



महाभारतात चक्रव्यूहात अडकवून अभिमन्यूला मारण्यात आलं होतं. आज २१ व्या शतकातही एक चक्रव्यूह तयार केला जातो आहे. हा चक्रव्यूह कमळाच्या फुलाच्या आकाराचा आहे. त्याचे चिन्ह पंतप्रधान मोदी आपल्या छातीवर लावून फिरतात. जे अभिमन्यूबरोबर करण्यात आलं, तेच आज देशातील जनतेबरोबर केलं जात आहे. देशातील तरूण, शेतकरी, महिला, छोटे उद्योगपती, यांना एका चक्रव्यूहात अडकवलं जात आहे", अशी टीका राहुल गांधी यांनी केली आहे.ज्याप्रमाणे अभिमन्यूला सहा जणांनी चक्रव्यूहात अडकवून मारलं. त्याप्रमाणे आजच्या चक्रव्यूहातही सहा जण काम करत आहेत. हे चक्रव्यूह पंतप्रधान मोदी, मोहन भागवत, अजित डोवाल, अमित शाह, अदानी आणि अंबानी, असे सहा जण चावलत आहेत. देशात आज भितीचं वातावरण आहे", असेही ते म्हणाले.२१ व्या शतकातील चक्रव्यूहामागे तीन शक्ती काम करत आहेत, एक म्हणजे भांडवलदारांची एकाधिकारशाही, दुसरं म्हणजे देशातील तपास संस्था आणि तिसरं म्हणजे राजकारण शक्ती. आज संपूर्ण देशाची संपत्ती केवळ दोन तीन व्यक्तींच्या हातात आहे, देशातील तपास संस्थांचा वापर करून विरोधकांवर दबाव आणला जातो आहे", अशी टीकाही राहुल गांधी यांनी केली."मोदी सरकारच्या चक्रव्यूहने सर्वप्रथम या देशातील छोट्या व मध्यम व्यावसायिकांवर हल्ला केला. हे तेच व्यावसायिक आहेत, जे देशातील लाखो तरुणांना रोजगार देतात. नोटबंदी आणि जीएसटी लागू करून त्यांचे व्यवसाय या सरकारने बंद पाडले. त्यामुळे कितीतरी तरुण बेजोरगार झाले. या उद्योगांसाठी सरकारने या अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद केलेली नाही", असा आरोपही राहुल गांधी यांनी केला. आज देशातील तरुणांपुढे सर्वात महत्त्वाचा मुद्दा बेरोजगारी आहे. स्पर्धा परीक्षांचे पेपर लीक होत आहेत. गेल्या १० वर्षात ७० वेळा या परीक्षांचे पेपर लीक झाले आहेत. या पेपर फुटीबाबत या अर्थसंकल्पात एक शब्दाचाही उल्लेख नाही. सरकारने तरुणांसाठी अग्नीवीर योजना फसवलं. या अर्थसंकल्पात अग्नीविरांच्या पेंशन योजनासाठी एक रुपयांची तरतूदही केली नाही. शेतकऱ्यांनी एमएमपीच्या कायदेशीर हमीची मागणी केली आहे. मात्र, त्याचा कोणताही उल्लेख या अर्थसंकल्पात करण्यात आलेला नाही, इतकं काय तर शेतकरी जेव्हा मला भेटालया संसदेत आले, तेव्हा त्यांना आत देखील येऊ दिले नाही,

### अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद नाही

", असेही ते म्हणाले.२१ व्या शतकातील चक्रव्यूहामागे तीन शक्ती काम करत आहेत, एक म्हणजे भांडवलदारांची एकाधिकारशाही, दुसरं म्हणजे देशातील तपास संस्था आणि तिसरं म्हणजे राजकारण शक्ती. आज संपूर्ण देशाची संपत्ती केवळ दोन तीन व्यक्तींच्या हातात आहे, देशातील तपास संस्थांचा वापर करून विरोधकांवर दबाव आणला जातो आहे""मोदी सरकारच्या चक्रव्यूहने सर्वप्रथम या देशातील छोट्या व मध्यम व्यावसायिकांवर हल्ला केला. हे तेच व्यावसायिक आहेत, जे देशातील लाखो तरुणांना रोजगार देतात. नोटबंदी आणि जीएसटी लागू करून त्यांचे व्यवसाय या सरकारने बंद पाडले. त्यामुळे कितीतरी तरुण बेजोरगार झाले. या उद्योगांसाठी सरकारने या अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद केलेली नाही

अशी टीकाही राहुल गांधी यांनी केली.भाजपा ज्यापद्धतीने चक्रव्यूह तयार करत आहेत, त्यामुळे देशाचं मोठं नुकसान होत आहे. देशातील कोट्यवधी लोकांना याचा त्रास होतो आहे. त्यामुळेच आम्हाला हे चक्रव्यूह तोडायचं असून आम्ही त्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असेही ते म्हणाले.महाभारतात चक्रव्यूहात अडकवून अभिमन्यूला मारण्यात आलं होतं. आज २१ व्या शतकातही एक चक्रव्यूह तयार केला जातो आहे. हा चक्रव्यूह कमळाच्या फुलाच्या आकाराचा आहे. त्याचे चिन्ह पंतप्रधान मोदी आपल्या छातीवर लावून फिरतात. जे अभिमन्यूबरोबर करण्यात आलं, तेच आज देशातील जनतेबरोबर केलं जात आहे. देशातील तरूण, शेतकरी, महिला, छोटे उद्योगपती, यांना एका चक्रव्यूहात अडकवलं जात आहे", अशी टीका राहुल गांधी यांनी केली आहे.ज्याप्रमाणे अभिमन्यूला सहा जणांनी चक्रव्यूहात अडकवून मारलं. त्याप्रमाणे आजच्या चक्रव्यूहातही सहा जण काम करत आहेत. हे चक्रव्यूह पंतप्रधान मोदी, मोहन भागवत, अजित डोवाल, अमित शाह, अदानी आणि अंबानी, असे सहा जण चावलत आहेत. देशात आज भितीचं वातावरण आहे.

# तुर्की राष्ट्रपतींची इस्रायलला हल्ल्याची धमकी

## हिजबुल्लाहने इस्रायलवर हल्ला करून दंड थोपटले आहेत

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इस्रायल हमास संघर्ष थांबण्याचं नाव घेत नाहीये. अशातच मध्य-पूर्वेतील मुस्लिम देश इस्रायलला घेरण्याच्या तयारीत आहेत. हिजबुल्लाहने इस्रायलवर हल्ला करून दंड थोपटले आहेत. पाठोपाठ तुर्कीनेही इस्रायलविरोधात शड्डू ठोकला आहे. तुर्कीचे राष्ट्रपती रेसेप तैय्यप एर्दोगन यांनी रविवारी (२८ जुलै) इस्रायलविरोधात सैन्य कारवाई करण्याची धमकी दिली आहे.**



इस्रायल आणि हिजबुल्लाहमध्ये तणाव वाढलेला असतानाच एर्दोगन यांनी देखील यात उडी घेतली आहे. दरम्यान, एर्दोगन यांच्या धमकीचा इस्रायलवर कोणताही परिणाम झालेला नाही. उलट इस्रायलने तुर्कीला गंभीर इशारा दिला आहे. इस्रायलने म्हटलं आहे की "त्यांची अवस्था सद्दाम हुसैनसारखी होईल." सद्दाम हुसैन हे इराकचे माजी अध्यक्ष होते, ज्यांना खुलेआम फाशीची शिक्षा देण्यात आली होती. इस्रायलचे परराष्ट्र मंत्री इस्रायल काट्ज यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे, या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे, "इस्रायलवर हल्ला करण्याची धमकी देऊन एर्दोगन हे सद्दाम हुसैनच्या

### जागतिक पातळीवरून टीका केली

गाझा पट्टीत कशा प्रकारचा हस्तक्षेप करेल हे सांगितलं नाही. एर्दोगन हे इस्रायल-हमास युद्ध सुरू झाल्यापासून सातत्याने इस्रायलविरोधात बोलत आहेत. इस्रायलच्या गाझातील हस्तक्षेपावर त्यांनी जागतिक पातळीवरून टीका केली आहे. तसेच एर्दोगन त्यांच्या पक्षाच्या एका कार्यक्रमात म्हणाले होते, आपल्याला (तुर्की) खूप मजबूत आणि सक्षम व्हावं लागेल, जेणेकरून इस्रायल पॅलेस्टाईनबरोबर जे काही करतोय ते करण्याची त्यांची हिंमत होणार नाही. आपण काराबाखमध्ये घुसलो, लीबियात घुसलो तसा कारनामा पुन्हा करू शकतो.

पावलावर पाऊल टाकत आहेत असं दिसतंय. सद्दाम हुसैनचं पुढे काय झालं, तो कसा मारला गेला ते एर्दोगन यांनी लक्षात ठेवायला हवं". काट्ज यांनी त्यांच्या पोस्टमध्ये एर्दोगन आणि सद्दाम हुसैन यांचे फोटो एकत्र करून शेअर केले आहेत. एर्दोगन म्हणाले होते की "तुर्कीचं सैन्य इस्रायलमध्ये घुसू शकतं, जसं यापूर्वी लीबिया आणि नागोर्नो काराबाखमध्ये घुसलं होतं.

# तौबा तौबा' गाण्याची हूकस्टेप!

नुपूर शिखरेने मकरंद अनासपुरे यांच्या 'ढिपाडी ढिपांग' या गाजलेल्या गाण्यावर डान्स केला आहे. परंतु, या मराठी गाण्यावर डान्स करताना नुपूरने चक्क विकी कौशलच्या व्हायरल 'तौबा तौबा' गाण्याची हूकस्टेप केली आहे. गेल्या महिन्याभरापासून सोशल मीडियावर 'तौबा तौबा' गाणं चांगलंच चर्चेत आलं आहे.विकी कौशल, तृप्ती डिमरी आणि एमी विर्क यांच्या मुख्य भूमिका असलेल्या 'बॅड न्यूज' चित्रपटात 'तौबा तौबा' हे गाणं आहे. 'तौबा तौबा' गाण्याची हूकस्टेप जराशी कठीण आहे. त्यामुळे ही स्टेप नेमकी कशी करायची याचे विविध मजेशीर ट्रेनिंग व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. अगदी आमिर खानच्या जावयाला सुद्धा ही स्टेप करण्याचा मोह आवरलेला नाही.नुपूर शिखरेने मराठमोळ्या गाण्यावर जबरदस्त डान्स करत विकीच्या 'तौबा तौबा' गाण्याची हूकस्टेप केली आहे. नेटकऱ्यांनी सुद्धा अभिनेत्याच्या या व्हिडीओवर लाइक्स व कमेंट्चा वर्षाव केला आहे. मिथिला पालकर, प्राजक्ता कोळी या अभिनेत्रींनी या व्हिडीओवर कमेंट करत नुपूरला 'बेस्ट' म्हटलं आहे. तर, अन्य काही युजर्सनी "वाह नुपूर आम्हाला वाटलं नव्हतं तू हे गाणं व्हिडीओला जोडशील", "अरे तौबा तौबा गाणं आम्हाला वाटलं आहे", लय भारी", "नुपूरचं मराठी त्याच्या प्रेम" अशा प्रतिक्रिया व्हिडीओवर दिल्या आहेत.



# भाईजानने वाचवला होता लहान मुलीचा जीव!



बॉलीवूडचा भाईजान म्हणजेच सलमान खान सतत कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असतो. या वर्षाच्या सुरुवातीला सलमान खानच्या घरावर गोळीबार झाला होता, याबरोबरच त्याच्या पनवेलजवळच्या फार्महाऊसमध्ये दोन अज्ञातांनी शिरण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे सलमान खान मोठ्या चर्चांचा भाग बनला होता. याबरोबरच काही दिवसांपूर्वी सलमान खानने लॉरेन्स बिश्नोई गँग मला आणि माझ्या कुटुंबाला जीवे मारण्याचा प्रयत्न करत असल्याचा जबाब पोलिसांना दिला होता. त्यामुळे सलमान खान मोठ्या चर्चेत आला होता. मात्र, २०१० मध्ये सलमान खान(SALMAN KHAN) एका वेगळ्या कारणामुळे चर्चेत आला होता. सलमान खानने एका लहान मुलीला बोन मॅरो ट्रान्सप्लांट (अस्थिमज्जा प्रत्यारोपण) करत तिचा जीव वाचवला होता. २०१० च्या झी न्यूज रिपोर्टनुसार, डॉक्टर सुनील पारेख हे मॅरो डोनर रजिस्ट्री इंडिया (MDRI) चे प्रमुख होते. त्यांनी म्हटले होते की, खूप लोक या आजाराचा सामना करत आहेत. मला सलमान खानचे आभार मानायचे आहेत, त्याने एका मुलीला मदत केली. चार वर्षांपूर्वी सलमानने पूजाविषयी वाचले होते. या लहान मुलीला बोन मॅरोची गरज होती. तो त्याच्या संपूर्ण फूटबॉल टीमसह बोन मॅरो दान करण्यासाठी आला होता. दुर्दैवाने त्याची टीम शेवटच्या क्षणी मागे सरली, मात्र सलमान खान आणि अरबाज खान यांनी आपला निश्चय सोडला नाही आणि ते बोन मॅरो दान करणारे पहिले दाते ठरले. बोन मॅरो दान करण्याविषयी भारतातील समस्यांविषयी बोलताना सलमान खानने त्यावेळी म्हटले होते की, भारतात ही समस्या असण्याचे कारण बोन मॅरो ट्रान्सप्लांटबद्दल जागरुकता नाही असे नाही, तर आपला त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण ही सुद्धा समस्या आहे. हे फक्त रक्त चाचणी केल्यासारखे आहे.

# सोनाक्षीने साडी नेसण्यामागचे कारण

बॉलीवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा काही दिवसांपासून आपल्या खासगी आयुष्यामुळे मोठ्या चर्चेत आहे. तिने नुकतीच झहीर इक्बालबरोबर लग्नगाठ बांधली असून, तिने केलेल्या आंतरधर्मीय विवाहामुळे तिच्यावर खूप टीका करण्यात येत होती. आता सोनाक्षीने एका मुलाखतीदरम्यान, तिने लग्नात तिच्या आईची साडी का नेसली होती, यावर खुलासा केला आहे.सोनाक्षी याबद्दल बोलताना म्हणते की, माझ्या डोक्यात गोष्टी स्पष्ट होत्या. मला लग्नात आणि संगीत सोहळ्यात कोणते कपडे परिधान करायचे आहेत, हे मी आधीच ठरवले होते. मला माझ्या आईची साडी व तिचे दागिने घालायचे होते आणि मी तेच केले. रिसेप्शनच्या वेळी मला लाल रंगाची साडी नेसायची आहे, हेसुद्धा मी ठरवले होते. हे सगळं आधीपासूनच माझ्या डोक्यात होते आणि त्या दिवशी फक्त मी ते प्रत्यक्षात आणले. पुढे बोलताना तिने म्हटले की, मला खरेच असे वाटते की, ती साधी नवरी कुठेतरी मागे राहत आहे. मी परिधान केलेल्या कपड्यांमध्ये मला श्वास घेता येत होता. मी इकडे-तिकडे फिरू शकत होते आणि त्यामुळे मी माझ्या लग्नाचा आनंद घेऊ शकले.

# मला वाटले माझा पुनर्जन्म झाला

अनेकदा मुलीबरोबर म्हणजेच राहा कपूरबरोबर असलेल्या नात्याबद्दल खुलेपणाने बोलत असतो. राहाबरोबरचे त्याचे अनेक फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसतात. आता त्याने एका मुलाखतीदरम्यान राहाच्या जन्मानंतर त्याच्यात काय बदल झाले, याबद्दल खुलासा केला आहे.रणबीर कपूरने निखिल कामथच्या यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्याने राहाबरोबरचे त्याचे नाते कसे आहे, यावर भाष्य केले आहे. तो म्हणतो, "राहाच्या जन्मानंतर जेव्हा पहिल्यांदा तिला मी माझ्या हातात घेतले होते, तो क्षण माझ्यासाठी अत्यंत मौल्यवान होता. ज्याक्षणी मी वडील झालो, त्यावेळेपासून माझे आयुष्य बदलले. मला वाटले माझा पुनर्जन्म झाला आहे. आयुष्याची ४० वर्षे मी कोणतेतरी वेगळे आयुष्य जगलो आहे, असे वाटले. नवीन भावना, नवीन विचार माझ्या मनात येऊ लागले. मी कधीच मरणाला घाबरत नव्हतो. मी कायम हा विचार करायचो की, मी वयाच्या ७१ व्या वर्षी मरेन, कारण आठ या आकड्याबद्दल मला प्रचंड आकर्षण आहे.



# तैमूरला सांभाळण्यासाठी अडीच लाख रुपये पगार?

बॉलीवूडचे कलाकार हे नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने सतत चर्चेत असतात. कधी त्यांचे चित्रपट, कधी त्यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्ट, तर कधी त्यांचे वैयक्तिक आयुष्य यांमुळे हे कलाकार चर्चांचा भाग बनतात. आता बॉलीवूडची लाडकी बेबो म्हणजेच करीना कपूर खान( KAREENA KAPOOR KHAN) सध्या तैमूरच्या नॅनी ललिता डिसिल्वा यांच्यामुळे चर्चेत आली आहे.ललिता डिसिल्वा यांनी नुकतीच 'पिंकविला'ला मुलाखत दिली. त्यावेळी त्यांना असे विचारण्यात आले की, अनेक रिपोर्ट्मधून समोर आले आहे की, महिन्याला तुमचा पगार २.५ लाख आहे. त्यावर त्यांनी दिलेले उत्तर मोठ्या चर्चेत आहे. त्या म्हणतात, "तितके पैसे मला मिळाले असते, तर बरे झाले असते. या चर्चा जेव्हा सुरू होत्या त्यावेळी मी करीनाला विचारले होते, की तुम्ही खरंच इतका पगार मला देणार आहात? त्यावर करीनाने मला म्हटले होते की, हा सगळा विनोदाचा भाग आहे, याला गांभीर्याने घेऊ नका." त्याबरोबरच त्यांनी करीना कपूर खान आणि सैफ अली खान यांचे त्यांच्या मुलांशी म्हणजेच तैमूर आणि जेहबरोबर कसे नाते आहे याचादेखील खुलासा केला आहे. त्या म्हणतात- "तैमूरच्या शाळेत जितक्या स्पर्धा, मीटिंग असतात, त्या सगळ्यांना करीना स्वत: हजर असते. सैफ आणि करीना जसे स्वत:साठी वेळापत्रक बनवतात, त्याचप्रमाणे मुलांसाठीदेखील वेळापत्रक बनवतात.

# नदालवर जोकोविच पडला भारी!

## लाल मातीच्या बादशाहचे एकेरीत पदकाचे स्वप्न भंगले

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था



**पॅरिसमध्ये ऑलिम्पिक २०२४ स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत जगभरातील अनेक दिग्गज खेळाडूही सामील झाले आहेत. टेनिसमधील दोन स्टार खेळाडू नोवाक जोकोविच आणि राफेल नदाल हे दोन खेळाडूही या स्पर्धेत खेळत आहेत. दरम्यान, हेच दोन कट्टर प्रतिस्पर्धी सोमवारी एकेरीच्या दुसऱ्या फेरीत आमने-सामने होते.पॅरिस ऑलिम्पिकमध्ये लाल मातीच्या कोर्टवर टेनिसचे सामने खेळवले जात आहेत. या कोर्टवर नदालचा खेळ वर्षानुवर्षे बहरताना दिसला आहे. त्यामुळे त्याला लाल मातीचा बादशाह असंही म्हटलं जातं. मात्र सोमवारी झालेल्या सामन्यात त्याच्यावर सार्बियाच्या नोवाक जोकोविचने वर्चस्व राखलं.**

दुसऱ्या फेरीत जोकोविचने स्पेनच्या नदालला ६-१,६-४ अशा दोन सरळ सेटमध्ये पराभूत केले. त्यामुळे एकेरीतून आता नदालचे आव्हान संपले आहे. परंतु, तो कार्लोस अल्काराजबरोबर स्पेनसाठी दुहेरीतही खेळत असल्याने तिथे त्याला पुढे जाण्याची अजूनही संधी आहे.दरम्यान, सोमवारी झालेल्या सामन्यात पहिल्याच सेटमध्ये जोकोविचने नदालवर सुरुवातीलाच वर्चस्व राखले होते. त्याने आपली सर्व्हिस राखण्याबरोबरच नदालची सर्व्हिस तोडत पहिले पाचही गेम जिंकले होते. मात्र त्यानंतर नदालने पुनरागमन सहावा गेम जिंकला. जोकोविचने पहिले चारही गेम जिंकले होते. पण यानंतर नदालने भारी पुनरागमन केलं. त्याने जोकोविच्या सर्व्हिस तोडत सलग ४ गेम जिंकत सेटमध्ये ४-४ अशी बरोबरी साधली.यानंतरही नदालने जिंकण्याचा पूर्ण प्रयत्न केला. मात्र नंतर पुन्हा जोकोविचने नदालची सर्व्हिस तोडली आणि ५-४ अशी आघाडी घेतली. पुढचा गेमही त्याने जिंकत सामनाही जिंकला आणि तिसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. जोकोविच यंदा पहिले ऑलिम्पिक सुवर्णपदक मिळवण्याच्या प्रयत्नात आहे. नदालने दुहेरीत अल्काराजबरोबर खेळताना पहिल्या फेरीत अर्जेंटिनाच्या मॅक्सिमो गोन्धालेझ आणि अँद्रे मोल्टेनी या जोडीला ७-६ (६-४), ६-४ अशा फरकाने पराभूत केलं होतं. त्यामुळे आता त्यांची जोडी दुसऱ्या फेरीत पोहचली आहे.जोकोविचने सातव्या गेममध्ये पहिला सेट नावावर करत आघाडी घेतली. दुसऱ्या सेटमध्येही जोकोविचची सुरुवात भन्नाट झाली होती. त्याच्यासमोर काही दिवसांपूर्वीच कमबॅक केलेल्या नदालला खेळणे कठीण जात होते.दुसऱ्या फेरीत जोकोविचने स्पेनच्या नदालला ६-१, ६-४ अशा दोन सरळ सेटमध्ये पराभूत केले. त्यामुळे एकेरीतून आता नदालचे आव्हान संपले आहे. परंतु, तो कार्लोस अल्काराजबरोबर स्पेनसाठी दुहेरीतही खेळत असल्याने तिथे त्याला पुढे जाण्याची अजूनही संधी आहे.दरम्यान, सोमवारी झालेल्या सामन्यात पहिल्याच सेटमध्ये जोकोविचने नदालवर सुरुवातीलाच वर्चस्व राखले होते. त्याने आपली सर्व्हिस राखण्याबरोबरच नदालची सर्व्हिस तोडत पहिले पाचही गेम जिंकले होते. मात्र त्यानंतर नदालने पुनरागमन सहावा गेम जिंकला. जोकोविचने पहिले चारही गेम जिंकले होते.

### पदकाचे स्वप्न भंगले

जोकोविच्या सर्व्हिस तोडत सलग ४ गेम जिंकत सेटमध्ये ४-४ अशी बरोबरी साधली.यानंतरही नदालने जिंकण्याचा पूर्ण प्रयत्न केला. मात्र नंतर पुन्हा जोकोविचने नदालची सर्व्हिस तोडली आणि ५-४ अशी आघाडी घेतली. पुढचा गेमही त्याने जिंकत सामनाही जिंकला आणि तिसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. जोकोविच यंदा पहिले ऑलिम्पिक सुवर्णपदक मिळवण्याच्या प्रयत्नात आहे.नदालने दुहेरीत अल्काराजबरोबर खेळताना पहिल्या फेरीत अर्जेंटिनाच्या मॅक्सिमो गोन्धालेझ आणि अँद्रे मोल्टेनी या जोडीला ७-६ (६-४), ६-४ अशा फरकाने पराभूत केलं होतं. त्यामुळे आता त्यांची जोडी दुसऱ्या फेरीत पोहचली आहे.जोकोविचने सातव्या गेममध्ये पहिला सेट नावावर करत आघाडी घेतली. त्याच्यासमोर काही दिवसांपूर्वीच कमबॅक केलेल्या नदालला खेळणे कठीण जात होते.जोकोविच यंदा पहिले ऑलिम्पिक सुवर्णपदक मिळवण्याच्या प्रयत्नात आहे.

# बेन स्टोक्सचे वेस्ट इंडिजविरुद्ध अर्धशतक

## इंग्लंडने मालिकाही 3-0 अशा फरकाने जिंकली

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**वेस्ट इंडिजकडून अल्झारी जोसेफने सर्वाधिक 4 विकेट्स घेतल्या.दुसऱ्या डावात वेस्ट इंडिजचा संघ 175 धावांवर सर्वबाद झाला. त्यामुळे वेस्ट इंडिज इंग्लंडला केवळ 87 धावांचे लक्ष्य देऊ शकले. वेस्ट इंडिजकडून मायकेल लुईसने 57 आणि कावेम हॉजने 55 धावा केल्या.87 धावांचे लक्ष्य इंग्लंडने तिसऱ्या दिवशी एकही विकेट न गमावता 7.2 षटकांत पार केले.**

संघासाठी कर्णधार बेन स्टोक्स सलामीला आला आणि त्याने 28 चेंडूत 9 चौकार आणि 2 षटकारांच्या मदतीने नाबाद 57 धावांची खेळी केली. तर बेन डकेट 26 धावा करून नाबाद परतला. स्टोक्सने इंग्लंडसाठी कसोटीतील सर्वात जलद अर्धशतक झळकावले. स्टोक्सने अवघ्या 24 चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. याआधी इंग्लंडकडून कसोटीत सर्वात जलद अर्धशतक करण्याचा विक्रम इयान बॉथमच्या नावावर होता. त्याने 1981 मध्ये दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर भारताविरुद्ध 28 चेंडूत अर्धशतक केले होते. आता बेन स्टोक्सने त्याचा 43 वर्ष जुना विक्रम मोडीत काढला.तिसऱ्या सामन्यात प्रथम वेस्ट इंडिजने २८२ धावा केल्या. प्रत्युत्तरात इंग्लंडने पहिल्या डावात ३७६ धावा केल्या. वेस्ट इंडिजला दुसऱ्या डावात १७५ धावाच करता आल्या. त्यानंतर इंग्लंडने ८२ धावांचे लक्ष्य एकही गडी न गमावता पार केले.इंग्लंड गुणतालिकेत सहाव्या स्थानी आहे. इंग्लंडने WTC 2023-25 या स्पर्धेत आतापर्यंत १३ कसोटी खेळल्या आहेत. त्यात इंग्लंडच्या नावे ६ विजय आणि ६ पराभव आले तर एक सामना अनिर्णित राहिला. त्यामुळे इंग्लंडच्या विजयाच्या गुणांची टक्केवारी ३६.५४ असून त्यांचे ५७ गुण आहेत.

### वेस्ट इंडिजच्या संघाचा दारूण पराभव

वेस्ट इंडिजच्या संघाचा दारूण पराभव झाल्याने ते आता नवव्या स्थानी आहेत. वेस्ट इंडिजकडे केवळ १६ गुण असून विजयाच्या गुणांची टक्केवारी १९.०५ इतकी कमी आहे. WTC 2023-25 या स्पर्धेत आतापर्यंत वेस्ट इंडिजने ७ कसोटी सामने खेळले असून त्यात केवळ एकात विजय मिळवला आहे. ५ सामन्यात त्यांना पराभवाचा सामना करावा लागला तर उर्वरित कसोटी अनिर्णित राहिली.भारतीय संघाने WTC 2023-25 मध्ये आतापर्यंत ९ सामने खेळले आहेत. त्यात भारताला ६ सामन्यात विजय तर २ सामन्यात पराभव स्वीकारावा लागला. १ सामना अनिर्णित राहिला. भारताचे एकूण गुण ७४ असून विजयाच्या गुणांची टक्केवारी ६८.५२ आहे. ऑस्ट्रेलियाच्या संघाचे गुण भारतापेक्षा जास्त म्हणजे ९० आहेत, पण विश्व कसोटी अजिंक्यपद स्पर्धेतील क्रमवारी ही विजयाच्या गुणांच्या टक्केवारीवर ठरते. त्यात ऑस्ट्रेलिया केवळ ६२.५० टक्केच विजय मिळवू शकला असल्याने तो दुसऱ्या स्थानी आहे.